# कोट्यवधींची यंत्रे चोरणाऱ्या टोळीचा छडा

## ५ चोरटे व २.२७ कोटींचा मुद्देमाल जप्त

**हदगाव : तुळजापूर-नांदेड-नागपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या वारंगा,हदगाव, उमरखेड, महागाव दरम्यानचे काम करणाऱ्या सद्भाव इंजिनीअरिंग या कंपनीच्या कॅम्पमधून यंत्रे, अवजड वाहने आणि इतर कोट्यवधींचे साहित्य कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने चोरट्यांनी चोरून नेले. पोलिसांनी प्रकरणाचा छडा लावत चोरट्यांकडून अंदाजे २.२८ कोटी ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



तुळजापूर-नागपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम २०१८ साली सुरू झाले. या महामार्गाचे वारंगा ते महागाव दरम्यानचे काम करणाऱ्या सद्भाव इंजिनीअरिंग कंपनीचे मुख्य मालक विष्णू पटेल यांचे सन २०२१ मध्ये निधन झाले. कंपनीतील इतर संचालकांच्या वादामुळे कंपनीने हे काम सोडून दिले. नंतर राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने हे काम गावर कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने सद्भाव इंजिनीअरिंगचे बरडशेवाळा येथील आणि उमरखेडजवळील कॅम्प गावर कन्स्ट्रक्शनला वापरण्यासाठी दिले. सध्या या रस्त्याचे काम पूर्णत्वास होत आहे. त्यामुळे गावर कन्स्ट्रक्शनने सर्व साधनसामुग्री इतर राज्यातील कामावर हलवण्यास सुरुवात केली. दरम्यान, या कॅम्पवरील बरेच साहित्य चोरीला गेल्याचे प्रोजेक्ट मॅनेजरला लक्षात आले. त्यामुळे गावर कन्स्ट्रक्शनचे प्रोजेक्ट मॅनेजर गौतमकुमार गजेन्द्रप्रसाद सिंह ३८ प्रोजेक्ट मॅनेजर, रा. सिमरी, ता. सकरा, जि. मुजफ्फरनगर, बिहार यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, त्यांच्या कब्जातील दुरुस्त/नादुरुस्त वाहने व इतर असा एकूण १.६० कोटींचा ऐवज नंदू राठोड व दर्शन भंडारी यांनी त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी विक्री केला व विक्री करण्यास सहकार्य केले. या त्यांच्या तक्रारीवरून गुरनं ७६२/२०२७ नुसार चार जणांविरुध्द गुन्हा दाखल केला.या प्रकरणाचा तपास यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी पुसद येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन यांच्याकडे दिला.

सदर गुन्ह्याच्या तपासात घटना ठिकाण, घटनेच्या वेळचे जाणारे-येणारे मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करून गुन्ह्यातील आरोपी निष्पण्ण करून आरोपी नंदू बळीराम राठोड (४९, रा. डॉ. झाकीर हुसेन वॉर्ड, उमरखेड, ता. उमरखेड, जि. यवतमाळ), दर्शन संतोष भंडारी (३०, रा. फॅक्टरी वॉर्ड, उमरखेड), लखन धनसिंग जाधव (२२, रा. कौडगाव, ता. महागाव), प्रकाश संतोष वानखेडे (२७, रा. नागचौक, उमरखेड), शेख आवेद शेख युनूस (३०, रा. डॉ. झाकीर हुसेन वॉर्ड, उमरखेड) यांना दि. १३ ऑगस्ट रोजी अटक केली. प्रथम वर्ग न्यायालय, उमरखेडने चारही आरोपींना पोलीस कोठडी दिली.गुन्ह्यात वापरलेल्या २ क्रेन व आरोपींनी चोरून नेलेल्या हिन्दुस्थान लोडर, कॉम्प्रेशर, मोटार व मशीन, ३ पट्टे, असा एकूण ६७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आजपावेतो २,२७,९०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींचा माग काढण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पुसद येथील गुन्हे तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे ८ दिवसांपासून उमरखेडला तळ ठोकून आहेत. सदर कार्यवाही यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन, उपनिरीक्षक रवी चव्हाण, पोहेकॉ. सुनील मदने, धम्मानंद केवटे, पोकॉ. गजानन जाधव यांनी केली.